# :: प्रेस नोट ::

दि. ०९/१२/२०२१

आरोपी लोकसेवक - श्री.पठाण आसदखान बिबनखान, वय ५१ वर्ष, व्यवसाय भुमापक भुमि अभिलेख कार्यालय, गेवराई , रा.सिरसाळा, ता.परळी वै.जि.बीड व श्री.मयुर कडूदास कांबळे, वय ३० वर्ष, व्यवसाय झेरॉक्स चालक , रा.संजय नगर गेवराई,ता.गेवराई,जि.बीड ( खाजगी इसम ) यांना १०००/- (एक हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचेकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | गेवराई |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १.श्री.पठाण आसदखान बिबनखान, वय ५१ वर्ष, व्यवसाय भुमापक भुमि अभिलेख कार्यालय, गेवराई , रा.सिरसाळा, ता.परळी वै.जि.बीड २. श्री.मयुर कडूदास कांबळे, वय ३० वर्ष, व्यवसाय झेरॉक्स चालक , रा.संजय नगर गेवराई,ता.गेवराई,जि.बीड ( खाजगी इसम ) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/- ( एक हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक.०९/१२/२०२१ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे आईचे नावावर असलेल्या जमिनीच्या मोजणी झालेल्यानंतर पडीक म्हणून मारलेला शेरा बदलुन नकाशाची नक्कल देण्यासाठी भुमापक कार्यालय, गेवराई येथील श्री.पठाण हे १०००/- हजार रुपये लाचेची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक.०९/१२/२०२१ रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक श्री.पठाण यांनी १०००/- रुपये लाचेची मागणी करुन खाजगी इसम श्री. कांबळे यांचे कडे १०००/- रुपये लाच रक्कम देण्यास सांगतीले<br>सदर लाच मागणीवरुन सापळा लावला असतां आलोसे श्री.पठाण यांनी केलेल्या मागणी वरुन श्री. कांबळे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडून १०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले नंतर त्यांनी पुन्हा तक्रारदार यांना सदर लाच रक्कम परत दिली. परत दिलेली लाच रक्कम तक्रारदार यांचे कडून पंचासमक्ष आलोसे श्री.पठाण यांनी भुमि अभिलेख कार्यालय , गेवराई येथे स्वत : स्विकारल्याने रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>आलोसे श्री.पठाण आसदखान बिबनखान, वय ५१ वर्ष, व्यवसाय भुमापक भुमि अभिलेख कार्यालय, गेवराई,रा. सिरसाळा, ता.परळी वै.जि.बीड व श्री.मयुर कडूदास कांबळे, वय ३० वर्ष, व्यवसाय झेरॉक्स चालक , रा.संजय नगर गेवराई,ता.गेवराई,जि.बीड ( खाजगी इसम ) यांचे विरुध्द पोलीस ठाणे गेवराई येथे कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.डॉ.राहुल खाडे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,श्री.भारत राऊत,पोलीस उप-अधीक्षक,लाप्रवि,बीड यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक डॉ.सुनिता मिसाळ व पोलीस अमंलदार श्री.श्रीराम गिराम,श्री.भरत गारदे,श्री.अविनाश गवळी, ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :-**acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**

2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि कमांक :- १०६४

दुरध्वनी कमांक :-०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क्र. :-९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ८८८८८०७२९९

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९८८११००८१२३

पोलीस उप अधीक्षक,लप्रवि,बीड :- ९१५८९९९०९१

( डॉ.सुनिता मिसाळ )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.